**निशाणी क्रमांक ३०**

**<u>निशाणी क्रमांक ३४ वरील आदेशावरुन साक्षीदार क्रमांक ०१ संगिता आनंदराव लाटे यांचा शपथेवर आरोपीतर्फे उलटतपास श्री. डि. व्ही. माळी विधिज्ञ यांचे मार्फत–</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे आमच्या भावकीतील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमचे शेत व आरोपीचे शेत जवळजवळ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आम्हाला आमच्या शेतात जाण्यासाठी आरोपीच्या शेतातून जावे लागते.

प्रश्न – तुमही आरोपी यांच्या शेतातून बैलगाडी व जनावरे यांना नेता.

उत्तर – वाटणीनुसार ठरल्याप्रमाणे आम्हाला एकमेकांच्या शेतातून जावे लागते.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे आम्हाला त्यांच्या शेतातून जावू नका असे म्हणत होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आम्हाला त्यांच्या शेतातून जाऊ दिले नाही म्हणून आम्ही आरोपी विरुध्द ही खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी रामकृष्ण लाटे हे सोलापूर येथे होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१८ साली संध्याकाळी ०५.३० वाजेच्या सुमारास मी शेतात काम करीत असताना आरोपी तेथे आल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी रामेश्वर लाटे यांनी मला लाकडाने माझ्या डोक्यात, पाठीत मारले व त्यामुळे मी बेशुध्द झाले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी शिवीगाळ केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या साक्षी सरतपासात आरोपी विरुध्द सांगितलेला संपूर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की,

शासन वि. मारुती

**निशाणी क्रमांक ३०**

मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आर्टिकल अ वरील काठी गावात सहजरित्या उपलब्ध होते.

दिनांकः– १९/०६/२०२६.

श्रवणोत्तर स्वीकृत

VIVEK VITHALRAO NIVGHEKAR

Digitally signed by VIVEK VITHALRAO NIVGHEKAR
Date: 2026.06.19 18:14:40 +0530

(व्ही. व्ही. निवघेकर)

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग तुळजापूर